सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२६, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, पूरकपत्र क्र. EComp.No. १३८७१७३/H.D.४००१०/१०४/२०२५/SPECIAL१A, दि. २५/०३/२०२६.

**विषय** :- विधानसभा निवडणूक – २०२४ च्या बंदोबस्ताकरिता पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी भाडेतत्त्वावर घेण्यातआलेल्या ३०२ खाजगी वाहनांच्या रु. १,३८,१९,७२९/- च्या भाडे खर्चास कार्योत्तर मंजुरीबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, पूरकपत्र क्र. EComp.No. १३८७१७३/H.D.४००१०/१०४/२०२५/SPECIAL१A, दि. २५/०३/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०३२५१६०९४४४९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन पूरकपत्रानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 27-03-2026 15:26:54

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.) (अति.कार्य.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
पोलीस आयुक्त, पुणे शहर.
कार्यासन अधिकारी, का क्र.३०.

प्रत,
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य ,मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (लेखा).

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**विधानसभा निवडणूक - २०२४ च्या बंदोबस्ताकरिता पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी भाडेतत्त्वावर घेण्यात आलेल्या ३०२ खाजगी वाहनांच्या रु. १,३८,१९,७२९/- च्या भाडे खर्चास कार्योत्तर मंजुरीबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन पूरकपत्र क्र. EComp. No.१३८७१७३/H.D.४००१०/१०४/२०२५/SPECIAL१A**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,**
**दिनांक : २५ मार्च, २०२६**

**संदर्भ:-** १) पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे पत्र क्र. जा.क्र. पशा-५/मोपवि/विधानसभा निवडणूक/ भाडेतत्व वाहने/२०२६, दि. १८/०३/२०२६

२) शासन निर्णय क्र. EComp.No.१३८७१७३/H.D.४००१०/१०४/२०२५/SPECIAL१A, दिनांक १९/१२/२०२५.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या बंदोबस्ताकरिता पुणे शहर पोलीस आयुक्तालयामार्फत ३०२ खाजगी वाहने भाडेतत्त्वावर घेण्यात आली होती. सदर वाहने कायदा व सुव्यवस्था राखणे, केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांच्या हालचाली, सेक्टर पेट्रोलिंग, होमगार्ड जवानांची वाहतूक व नवप्रविष्ट कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी वापरण्यात आली. प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्या दरानुसार (५% जीएसटीसह) एकूण रु.१,३८,१९,७२९/- (अक्षरी : रुपये एक कोटी अडतीस लाख एकोणीस हजार सातशे एकोणतीस फक्त) इतका भाडे खर्च झाला होता.

संदर्भ क्र.२ अन्वये सदर खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यात आली होती. त्यानुसार देयके कोषागार कार्यालय, पुणे येथे सादर करण्यात आली. परंतु कोषागाराने देय असल्याच्या दिनांकानंतर एक वर्षापेक्षा अधिक कालावधी झाल्याने वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १७/०४/२०१५ मधील अनुक्रमांक ६, नियम क्र.४० नुसार कार्यवाही आवश्यक असल्याचा आक्षेप नोंदविला आहे.

पोलीस आयुक्त, पुणे शहर यांनी सदर आक्षेप दूर करण्यासाठी आवश्यक कार्यवाहीबाबत विनंती केली आहे. सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन पूरकपत्र :-**

वरील पार्श्वभूमीवर, उपरोक्त दि. १९/१२/२०२५ च्या शासन निर्णयात शेवटून दुसरा परिच्छेद खालीलप्रमाणे समाविष्ट करण्यात येत आहे:-

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक-२०२४ च्या बंदोबस्ताकरिता भाडेतत्त्वावर घेतलेल्या खाजगी वाहनांची भाडे देयके (रक्कम रु.१,३८,१९,७२९/-) कोषागारात विलंबाने सादर झाल्याने वित्त विभाग शासन निर्णय दिनांक १७/०४/२०१५ मधील अनुक्रमांक ६, नियम क्र.४० ला अनुसरून त्यासमोर विहित केलेल्या अटी व शर्तींची खातरजमा करण्याच्या अधीन राहून कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

सदर शासन पूरकपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०३२५१६०९४४४९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

Digitally signed by ARVIND TULSHIRAM SHETE
Date: 2026.03.25 16:11:11 +05'30'

**(अरविंद शेटे)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा व परिक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
पोलीस आयुक्त, पुणे शहर
निवडनस्ती (कार्यासन विशा-१अ)